<u>जलस्वराज्य - २ कार्यक्रम.</u>

शहरालगतच्या गावे / वाड्यांमधील योजनांच्या सविस्तर प्रकल्प अहवालांना तत्वत: मान्यता देण्यासाठी **“राज्यस्तरीय पडताळणी उप समिती”** गठीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

शासन निर्णय क्रमांकः जस्वप्र-०११६ / वि.सं. क. (तां) / प्र. क्र. २१ / पापु-११.

गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत, ७ वा मजला,
नवीन मंत्रालय, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४००००१.
तारीख: २ फेब्रुवारी, २०१६.

<u>वाचा :</u>

१) शासन निर्णय क्रमांकः जस्वप्र-१२१३ / प्र. क्र. २०० / पापु-११, दि. ४/१/२०१४.
२) शासन निर्णय क्रमांकः जस्वप्र-०२१४ / प्र. क्र. ५५ / पापु-११, दि. ११/६/२०१४.
३) शासन निर्णय क्रमांक: जस्वका-२/०७१५/विसंक(तां)/प्र.क्र.१३/पापु-११,दि.१/१/२०१६

प्रस्तावना :

जलस्वराज्य-२ कार्यक्रमांतर्गत संदर्भ क्र. २ मधील शासन निर्णयाच्या अनुषंगाने शहरालगतच्या गावे / वाड्यांमधील योजनांच्या सविस्तर प्रकल्प अहवालांच्या तांत्रिक मान्यता पूर्व तपासणीसाठी “**राज्यस्तरीय पडताळणी समिती**” गठीत करण्यात आली आहे.

राज्यस्तरीय पडताळणी समितीसमोर सादरीकरण करण्यापूर्वी शहरालगतच्या गावे / वाड्यांमधील योजनांच्या सविस्तर प्रकल्प अहवालांची सर्वसाधारण तपासणी सुधारणा सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्षांतर्गत विशेष संनियंत्रण कक्षामार्फत करुन शेरे पूर्तता करणे आवश्यक होते, तथापि उपरोक्त संदर्भ क्र. ३ अन्वये शहरालगतच्या गावे / वाड्यांमधील योजनांची अंमलबजावणी म. जी. प्रा. मार्फत करण्यास शासनाने मान्यता दिली असल्याने सदर सविस्तर प्रकल्प अहवालांची तांत्रिक तपासणी विशेष संनियंत्रण कक्षामार्फत करणे योग्य होणार नाही.

राज्यस्तरीय पडताळणी समितीसमोर सादरीकरण करण्यापूर्वी सविस्तर प्रकल्प अहवालांची तांत्रिक तपासणी करण्यासाठी संचालक (तांत्रिक), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे अध्यक्षतेखाली “**राज्यस्तरीय पडताळणी उप समिती**” गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

वरील बाबींस अनुसरुन राज्यस्तरीय पडताळणी समितीसमोर सादरीकरण करण्यापूर्वी सविस्तर प्रकल्प अहवालांची तांत्रिक तपासणी करण्यासाठी खालीलप्रमाणे "**राज्यस्तरीय पडताळणी उप समिती**" गठीत करण्यात येत आहे.

१.	संचालक (तांत्रिक), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.	अध्यक्ष
२.	मुख्य अभियंता, म. जी. प्रा., संबंधित प्रादेशिक विभाग.	सदस्य
३.	अधीक्षक अभियंता, विशेष संनियंत्रण कक्ष, सु.स. व प्र.व्य. कक्ष, नवी मुंबई.	सदस्य
४.	अधीक्षक अभियंता (मुख्यालय), म. जी. प्रा., मुंबई.	सदस्य
५.	अधीक्षक अभियंता (यांत्रिकी), म. जी. प्रा., ठाणे.	सदस्य
६.	वित्त नियंत्रक, सु.स. व प्र.व्य. कक्ष, नवी मुंबई.	सदस्य
७.	कार्यकारी अभियंता, म. जी. प्रा., संबंधित विभाग.	सदस्य
८.	कार्यकारी अभियंता, सु. स. व प्र. व्य. कक्ष, नवी मुंबई.	सदस्य सचिव

"राज्यस्तरीय पडताळणी उप समिती" ची कर्तव्ये व जबाबदाऱ्या :-

- ✓ जलस्वराज्य-२ कार्यक्रमांतर्गत शहरालगतच्या गावे /वाड्यांमधील योजनांच्या सविस्तर प्रकल्प अहवालांची तांत्रिक तपासणी करणे.
- ✓ त्रुटी असलेल्या प्रस्तावांची संबंधित यंत्रणेकडून पूर्तता करुन घेणे.
- ✓ तांत्रिकदृष्ट्या परिपूर्ण सविस्तर प्रकल्प अहवाल राज्यस्तरीय पडताळणी समितीकडे तत्वत: मान्यतेसाठी सादर करणे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०२०२११२६४६२१२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RUCHESH RAJBAHADUR JAIVANSHI

Digitally signed by RUCHESH RAJBAHADUR JAIVANSHI
DN: c=IN, o=Personal, postalCode=444505, st=Maharashtra, cn=RUCHESH RAJBAHADUR JAIVANSHI
Date: 2016.02.04 17:56:46 +05'30'

(रुचेश जयवंशी)

उपसचिव तथा प्रकल्प संचालक,
महाराष्ट्र शासन

प्रत :-

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राजभवन, मुंबई.

२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. विधानसभा/विधानपरिषद सदस्य (सर्व), महाराष्ट्र विधीमंडळ सचिवालय, मुंबई.
७. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई.
८. प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (सर्व) मंत्रालय, मुंबई.
१०. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
११. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
१२. विभागीय आयुक्त (सर्व)
१३. महानगरपालिका आयुक्त (सर्व)
१४. जिल्हाधिकारी (सर्व)
१५. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.
१६. महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), नागपूर.
१७. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१८. संचालक (तांत्रिक), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
१९. मुख्य अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
२०. संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, बेलापूर, नवी मुंबई.
२१. अधीक्षक अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
२२. प्रादेशिक उप संचालक (सर्व), भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा.
२३. कार्यकारी अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
२४. कार्यकारी अभियंता (सर्व), ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद.
२५. मुख्याधिकारी, नगरपालिका (सर्व)
२६. मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई.
२७. पा. पु. व स्व. विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने, मंत्रालय, मुंबई.
२८. निवड नस्ती (कार्यासन पापु-११)